# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- द्वद्वःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९-२३** **दिनांक २६/०१/२०२३**

## घरफोडी चोरी करणा-या सराईत आरोपीतांस अटक करुन एकुण ५,४३,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत- तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

तुळींज पोलीस ठाण्याचे हददीत घरफोडी चोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन अरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. सदर सुचनांच्या अनुषंगाने तुळींज पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत असलेले अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांच्याकडुन मिळालेल्या माहितीचे आधारे अरोपीत नामे १. देवेंद्र गणेश शेट्टी, २. शेखर नटराज नायर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी तुळींज पोलीस ठाणेत दाखल असलेला गु.रजि.नं. १२७५/२०२१ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ अन्वये केल्याचे सांगितल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक केली व गुन्हयातील घरफोडी केलेले ११ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २० तोळे चांदीचा कमरबंद ,एल. जी. कंपनीचा ६५ इंच कलर टि.व्ही. असा एकुण ३,८८,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. वर नमुद आरोपीत यांचेविरुध्द ठाणे शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात एकुण ६, मंबई शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात एकुण ४ व इकडील आयुक्तालय कार्यक्षेत्रात ०१ असे गुन्हे दाखल आहेत.

तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने तुळींज पोलीस ठाणेत दिनांक १६.०१.२०२३ रोजी दाखल असलेला गु.रजि. नं. ४२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४,३८० मधील संशयित आरोपीत प्रशांत रत्नेश सिंग रा. शिर्डीनगर नालासोपारा, पुर्व यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे सांगितल्याने त्यास अटक करुन त्याचे ताब्यातुन गुन्ह्यात चोरीस गेलेला होनीव्हेल कंपनीचे मोबाईल डिव्हाईस मशीन व सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा १,५५,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. अशा प्रकारे तुळीज ०२ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२ वसई, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी. बाळासाहेब बांदल, परि.पो.उप.निरी. गिते सहा.पो.उप.निरी शिवानंद सुतनासे, पो.हवा. ०६०७१ आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, पांडुरंग केंद्रे , पो. अंम. छपरीबन, राऊत यांनी केली आहे.